दिनांक : ०१/०७/२०२४

# प्रेसनोट

डॉ. अझीझ शेख, प्रशासक तथा आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. किशोर गवस, अति. आयुक्त, डॉ. सुभाष जाधव, उप-आयुक्त (आरोग्य), श्री. मनीष हिवरे, सहा. सार्वजनिक आरोग्य विभागाचे अधिकारी, श्री. विनोद केणे, श्री. एकनाथ पवार, मुख्य स्वच्छता निरीक्षक तसेच प्लास्टिक निर्मूलन पथक प्रमुख व प्रदूषण मंडळाचे अधिकारी श्री. नांदगावकर यांच्या सयुक्त विद्यमानाने उल्हासनगर शहरात कॅम्प नं. ०२ व कॅम्प नं. ०३ मधील पेलूमल कंपाऊंड येथील एकल प्लास्टिक उत्पादक कारखान्यावर पाळत ठेऊन आज अचानक पणे धाड टाकून कार्यवाही करण्यात आली. या दरम्यान ३६५ Kg प्लास्टिक साठा व १०,००० रु. दंडात्मक कार्यवाही करण्यात आली अन्य वापर करण्याऱ्या विरुद्ध ५००० दंड वसूल करण्यात आला आहेत. पावसाळ्यात नाल्यामध्ये प्लास्टिक पिशव्या अडकून चॉकअप होण्याच्या घटना शहरात होत होत्या. मा. डॉ. अझीझ शेख, आयुक्त यांनी विभागांना सूचना देऊन पावसाळ्यापूर्वी कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या. यानुषगाने स्वच्छता विभागाद्वारे याआठवड्या अस्वच्छता करणाऱ्या २५१ वेक्ती विरुद्ध ९८,५५०/- व एकल प्लास्टिक पिशवीचा वापर व विक्री करणाऱ्या विक्रीते विरुद्ध ५५००० हजार रु. व ५०२ kg जप्ती १० वेकीकडून असे एकूण १,५३,५५० /- रु. दंडात्मक कारवाई करण्यात आली आहेत.

शहरातील सर्व मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते, फुटपाथ, नाली विषेश सफाई व स्वच्छता करुन नागरीकांना स्वच्छतेबाबत संदेश देवुन जनजागृती केली जात आहे. नागरीकांना शिस्त लागावी या करीता अस्वच्छता पसरविणाऱ्या नागरीकांना सूचना/नोटीसा देऊनही सार्वजनिक रस्त्यावर अस्वच्छता करणाऱ्या अशा नागरिकांविरुद्ध ही कार्यवाही सातत्याने सुरु राहणार असल्याची माहिती. डॉ. किशोर गवस, अति. आयुक्त यांनी दिली आहे. शहर स्वच्छ व सुंदर बनविण्यासाठी हातभार लावण्याचे आवाहन केले.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.